RNI No. MAHBIL/2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ४३ (४)] गुरुवार, मार्च १०, २०११/फाल्गुन १९, शके १९३२ [ पृष्ठे ३, किंमत रुपये २०.००

असाधारण क्रमांक १२

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८.—** महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. | १-३ |

## सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० मार्च २०११.

## MAHARASHTRA ORDINANCE No. VIII OF 2011.

AN ORDINANCE FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LOKAYUKTA AND UPA-LOKAYUKTAS ACT, 1971.

## सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८.

## महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक
१९७१ आयुक्त अधिनियम, १९७१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी
चा महा. तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची
४६. खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) अध्यादेश, २०११ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम २ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ याच्या कलम २ मधील खंड (के) च्या उपखंड (तीन) मधील,— १९७१ चा मुंबई ४६.

(क) परिच्छेद (अ) मध्ये,—

(एक) " जिल्हा परिषदेचा प्रत्येक अध्यक्ष आणि उपाध्यक्ष " या मजकुराऐवजी " जिल्हा परिषदेचा प्रत्येक अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सदस्य " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " पंचायत समितीचा सभापती व उप सभापती " या मजकुराऐवजी " पंचायत समितीचा सभापती, उप सभापती आणि सदस्य " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) परिच्छेद (ब) मध्ये,—

(एक) " नगरपालिकेचा प्रत्येक अध्यक्ष आणि उपाध्यक्ष " या मजकुराऐवजी " नगर परिषदेचा प्रत्येक अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सदस्य " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम " या मजकुराऐवजी " महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) परिच्छेद (ब) नंतर, पुढील परिच्छेद जादा दाखल करण्यात येईल :— १८८८ चा मुंबई ३. १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २. १९४९ चा मुंबई ५९.

" (क) मुंबई महानगरपालिका अधिनियम, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ अन्वये रचना केलेल्या सर्व महानगरपालिकेचा प्रत्येक महापौर, उप महापौर आणि महापालिका सदस्य आणि स्थायी किंवा कोणत्याही विषय समितीचा सभापती ; ".

## निवेदन

तेराव्या वित्त आयोगाने त्याच्या अहवालामधून, किमान सर्व महानगरपालिका, नगरपालिका व जिल्हापरिषदा यांमधील पदाधिकाऱ्यांविरुद्ध करण्यात आलेल्या भ्रष्टाचार आणि कुप्रशासन यासंबंधीच्या तक्रारी विचारात घेण्यासाठी एक स्वतंत्र स्थानिक स्वराज्य संस्था चौकशी प्राधिकारी नेमण्याची राज्य शासनाला शिफारस केली आहे. उक्त अहवालात आयोगाने आणखी असेही नमूद केले आहे की, जर सर्व पदाधिकारी किंवा पदाधिकाऱ्यांचा वर्ग राज्याच्या लोक आयुक्तांच्या अधिकाराच्या कक्षेत येत असेल तर, हीच व्यवस्था पुढे चालू ठेवावी किंवा अशा पदाधिकाऱ्यांना, शासनाने चौकशीसाठी नियुक्त केलेल्या चौकशी प्राधिकाऱ्याच्या अधिकारितेच्या कक्षेत आणावे याचा निर्णय राज्य शासनाने घ्यावा.

२. म्हणून, महाराष्ट्र शासनास, सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या, निवडून आलेल्या, सर्व पदाधिकाऱ्यांना उक्त अधिनियमामध्ये योग्य त्या सुधारणा करून, महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ (१९७१ चा महा. ४६) याच्या कक्षेत आणणे इष्ट वाटते.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही व उपरोक्त प्रयोजनासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, १९७१ (१९७१ चा महा. ४६) यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक ९ मार्च २०११.

**के. शंकरनारायणन्,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**के. पी. बक्षी,**
शासनाचे प्रधान सचिव (सेवा).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21 A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHENG/2009/35528

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक ५९(४)] गुरुवार, मार्च १०, २०११/फाल्गुन १९, शके १९३२ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १४.००

असाधारण क्रमांक १२

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Lokayukta and Upa-Lokayuktas (Amendment) Ordinance, 2011 (Mah. Ord.VIII of 2011), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

(Translation in English of the Maharashtra Lokayukta and Upa-Lokayuktas (Amendment) Ordinance, 2011 (Mah. Ord. VIII of 2011), published under the authority of the Governor.).

---

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 10 th March 2011.

## MAHARASHTRA ORDINANCE No. VIII OF 2011.

*AN ORDINANCE*

*further to amend the Maharashtra Lokayukta and Upa-Lokayuktas Act, 1971.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session ;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Lokayukta and Upa-Lokayuktas Act, 1971 , for the purposes hereinafter appearing ;

Mah. XLVI of 1971.

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (*1*) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Ordinance may be called the Maharashtra Lokayukta and Upa-Lokayuktas (Amendment) Ordinance, 2011.

(2) It shall come into force at once.

Amendment of section 2 of Mah. XLVI of 1971.

**2.** In section 2 of the Maharashtra Lokayukta and Upa-Lokayuktas Act, 1971, in clause (*k*), in sub-clause (*iii*),— Mah. XLVI of 1971.

(*a*) in paragraph (*a*),–

(*i*) for the words " every President and Vice-President of a Zilla Parishad " the words " every President, Vice-President and Councillor of Zilla Parishad " shall be substituted ;

(*ii*) for the words " Chairman and Deputy Chairman of a Panchayat Samiti " the words " Chairman, Deputy Chairman and member of a Panchayat Samiti " shall be substituted ;

(*b*) in paragraph (*b*),–

(*i*) for the words " every President and Vice-President of Municipal Council " the words " every President, Vice-President and Councillor of a Municipal Council " shall be substituted ;

(*ii*) for the words " Maharashtra Municipalities " the words " Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayats* and Industrial Townships " shall be substituted ;

(*c*) after paragraph (*b*), the following paragraph shall be added, namely :—

" (*c*) every Mayor, Deputy Mayor and Councillor of all Municipal Corporations and Chairman of Standing or any Subject Committee, constituted under the Mumbai Municipal Corporation Act, the City of Nagpur Corporaton Act, 1948 and the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949 ; ".

Bom. III of 1888. C. P. and Berar II of 1950. Bom. LIX of 1949.

STATEMENT

The Thirteenth Finance Commission in it's Report has recommended to the State Government to put into place a system of an independent local body Ombudsman for looking into complaints of corrpution and mal-administration against the functionaries of local bodies at least in all Municipal Corporations, Municipalities and *Zilla Parishads*. In the said report the Commission further stated that in the event all or a class of such functionaries fall under the jurisdiction of the Lok Ayukta of the State, it is for the State Government to decide whether to continue with these arrangements, or to shift the functionaries to the jurisdiction of Ombudsman.

2. The Government of Maharashtra, therefore, considers it expedient to bring all elected functionaries of all Municipal Corporations, Municipal Councils, *Zilla Parishads* and *Panchayat Samitis* within the purview of the Maharashtra Lokayukta and Upa-Lokayuktas Act, 1971 (Mah. XLVI of 1971), by amending the said Act, suitably.

3. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Lokayukta and Upa-Lokayuktas Act, 1971 (Mah. XLVI of 1971), for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 9th March 2011.

K. SANKARANARAYANAN,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the
Governor of Maharashtra,

K. P. BAKSHI,
Principal Secretary (Services) to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.